"सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक घटकांचा संकल्पना निर्मितीवर होणारा परिणाम व संकल्पना निर्मीतीत येणाऱ्या अडचणीचा अभ्यास "

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

शिक्षणशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवी नोंदणीसाठी
संशोधन प्रारुप सादर

संशोधिका

स्वामी दुर्गादेवी सदाशिव

एम.ए.,एम.एड्.,एम.फील.

मार्गदर्शक

डॉ.गिनगिने अशोक पांडुरंग

एम.एस्सी.,एम.एड्.,एम.फिल.,सेन,नेट.,पिएच.डी.,शिक्षणशास्त्र
शिक्षणशास्त्र संकुल स्वा. रा. ती. म. वि.,नांदेड.

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल स्वा. रा. ती. म. वि.,नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

२०१६

प्रस्तावना :

शालेय शिक्षणाचा आरंभ हा विद्यार्थ्यांचा विकासाच्या मार्गावरचा महत्वाचा टप्पा असतो. परिसरातुन घडणाऱ्या सहज शिक्षणाला शाळेमध्ये परिपुर्ण व्यक्तिमत्व जडण घडविण्यासाठी शिक्षण शास्त्रीय कालमर्यादीत नियोजनाची जोड मिळणे. हे नियोजन साध्य करण्यासाठी शाळा, शिक्षक, पर्यवेक्षकीय यंत्रणा असे पाठबळ प्राप्त होते. शिक्षणामुळे व्यक्ती स्वत: चा विकास साधत असतांना भोवतालच्या समाजाची संस्कृती व परंपरा स्वीकारुन समाजात सामावली जाते.

प्रत्येक विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व वेगळे असते. प्रत्येकाची आकलनक्षमता, अवधानकक्षा, आवडी-निवडी, कल इत्यादी भिन्न असतात. त्यामुळे प्रत्येकाची शिकण्याची गती वेगळी असते. कौंटुबिक अडचण आजार, पण तसेच व्यवसायिक कामामुळे शाळेतील अनुपस्थिती इत्यादी बाबीचा अध्ययनावर विपरित परिणाम होतो. विद्यार्थ्यांच्या अध्ययनात आकलनामध्ये आणि कौशल्य विकसनामध्ये उणिवा, त्रुटी राहु शकतात. असे विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत मागे पडतात. त्यांच्या क्षमतांचा विकास न झाल्याने ती समायोजन साधु शकत नाहीत व संकल्पना निर्मिती पातळीत मागे राहतात.

अनेकदा वर्गात अध्यापनाचे काम करत असतांना शिक्षकांचा समज असतो की, जे विद्यार्थी ज्या विषयात प्रबळ आहे. असे आपले निरीक्षण असते. त्या विद्यार्थ्याला त्या विषयाच्या अतिरिक्त पुरक मार्गदर्शनाची त्याच्या प्रबळ विषयातील एखाद्या संबोध किंवा संकल्पना निर्मिती किंवा संकल्पना स्पष्ट होण्याकरिता अतिरिक्त पुरक मार्गदर्शन करणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे.

शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यामध्ये भिन्नता आढळून येते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी अध्ययनाची संकल्पना ज्या प्रमाणे हळुहळु विकसित होत गेली. त्याच प्रमाणे अध्यापनाची संकल्पना ही बदलत गेली. एक काळ असा होता की, ज्या काळात अध्यापनात केवळ माहिती देणे अभिप्रेत होते. शिक्षक म्हणजे ज्ञानाचा प्रचंड साठा या प्रचंड ज्ञानाच्या साठ्यातील ज्ञान त्यांनी अध्ययन होण्यापर्यंत पोहचवणे असे कार्य होते. पण ही केवळ ज्ञानदानाची कल्पना हळुहळु मागे पडली काळ जसा-जसा पुढे लोटला तसा अध्यापनाचा अर्थ अधिक व्यापक होत गेला. अध्यापन म्हणजे अध्ययनार्थ्यांना केवळ माहिती देणे ज्ञान देणे, एवढेच नव्हे तर विविध कौशल्ये ही शिक्षकांनी अध्ययनार्थ्यांना ज्ञानासोबत दिली पाहिजेत.

एकविसाव्या शतकात तर इंटरनेटच्या मदतीने एखाद्या विषयावरील अद्ययावत ज्ञान अध्ययनार्थ्यांला घरबसल्या सहजपणे मिळवणे शक्य झाले आहे.

समाजाच्या बदलत्या गरजाप्रमाणे नवनविन विषय अभ्यासक्रमात समाविष्ठ होत आहेत. नवनविन उपक्रमांचा प्रवाहाचा प्रणालीचा, नविन अध्यापन तंत्राचा, अध्ययन पध्दतीचा प्रणालीमध्ये बदल होत आहेत. अशा विविध विचारांचा वापर करत असतांना विद्यार्थ्यांना अनुभव येतात हे अनुभव येत असतांना विद्यार्थ्यांच्या संकल्पना निर्मीती क्षमताचा अभ्यास केला जातो.

विद्यार्थ्यांतील संकल्पना निर्मिती पातळी किंवा क्षमता शोधण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अध्ययनक्षमतेचे मुल्यमापन करावे. सातत्यपुर्ण सर्वकष मुल्यमापनाव्दारे ज्या विद्यार्थ्यांची अध्ययनक्षमता किंवा संकल्पना निर्मिती पातळी अविकसित आहे. असे शिक्षकाच्या लक्षात येते. त्या विद्यार्थ्यांकरिता, विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन विषेश अध्ययन अनुभवाची निर्मिती किंवा निवड शिक्षकाने करावी. या अध्ययन अनुभवाव्दारे विद्यार्थी स्वतः च्या ज्ञानाची रचना करुन संकल्पनेची निर्मिर्ती करेल.

जे विद्यार्थी ज्या विषयात प्रबळ आहेत. उदा. मराठी, चित्रकला, गायन, वादन, इंटरनेट इ. त्याच्याकडे तसेच संकल्पना पातळी कमी असलेल्या विद्यार्थ्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असते या विद्यार्थ्यांची संकल्पना निर्मिती पातळी कोणत्या विषयात कमी आहे. त्या विषयासाठी अतिरिक्त वेळ शिक्षकांनी देऊन किंवा नविन उपक्रमांचा वापर करुन मार्गदर्शन करावे. एखाद्या Concept विद्यार्थ्यांना समजत नसेल तर भाषा सोपी करणे, टप्पा-टप्याने शिकविणे, एखादी कृती देऊन विद्यार्थ्यांस सहभागी करुन घेणे विविध शैक्षणिक पध्दतीचा वापर करणे तसेच द्रक-श्राव्य माध्यम, इंटरनेट, प्रसारमाध्यम इत्यादीचा वापर करुन विद्यार्थ्यांना संकल्पना निर्मिती पातळीवर आणता येईल.

प्रत्येक मुलाला त्याच्या आवडीचे, त्यांच्या आत्मविश्वास वाढवणारे आणि त्यांचे जीवनसमृध्द करेल असे गुणवत्तापुर्ण शिक्षण आपुलकीच्या व आनंददायी वातावरणात मिळणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांच्या बौध्दीक विकासाइतकाच सामाजिक, भावनिक, क्रियात्मक विकासही महत्वाचा आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांला हा विकास महत्वाचा आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांला संकल्पना निर्मिती क्षमता या विकासाची संधी मिळावी.

शाळा आपली आहे या शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी आपलेच आहेत. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करणे हे आपले कर्तव्य आहे. अशी भावना समाजात रुजविल्याशिवाय शिक्षणाचा सार्वत्रिकीकरणाऱ्या मोहिमेला संपुर्णतः यश प्राप्त होणार नाही. शाळा या संस्थेच्या उदिष्टांबाबत जाणिव जागृती, जबाबदारीची भावना समाजामध्ये निर्माण करणे आवश्यक आहे.

ब्रुनरची अध्ययन विषयक ज्ञानात्मक उपपती (Bruners Cognitive Theory of Leaving)

Jerome Bruner (१९१५) हा ज्ञानात्मक व विकासात्मक मानसशास्त्राचा अभ्यासक म्हणून ओळखला जातो. त्याने ज्ञानाच्या रचनेविषयी आपले विचार प्रकट केलेले आहेत. त्यांच्या विचारावर जीन पियाजेच्या विचारांचा प्रभाव पडलेला आढळून येतो. ब्रुनरने अध्ययन विषयक पध्दतशीर अशी उपपती मांडलेली नाही. परंतू अध्ययनामध्ये, व्यक्ति जी माहिती निवडते, स्मरणात ठेवते आणि तिचे रुपांतर करते या सर्व बाबींचा समावेश होतो असे ब्रुनर मानतो किंवा या बाबी अध्ययन होण्यासाठी आवश्यक आहेत. असे त्याचे मत आहे. अध्ययनविषयी प्रेरणेच्या बाबतीत तो म्हणतो अध्ययनबाबतीतील उदासिनता किंवा भावनिक क्षोभ याचा सुवर्णमध्य ही अध्ययनासाठीची आवश्यक बाब आहे.

ब्रुनरच्या मते, ज्ञानसंपादन ही एक कृतिशील प्रक्रिया आहे व्यक्ति नवीन माहिती, जाणीवपुर्वक संपादन करुन, आपणाकडे असणाऱ्या पुर्वज्ञानाची तिचा संबंध जोडते व नविन ज्ञानाची रचना तयार करते. व्यक्तिकडे असणारी पुर्वज्ञान संदर्भ चौकट नविन ज्ञानाला अर्थ प्राप्त करुन देत असते. अशा रितीने प्रत्येक व्यक्ति ज्ञान संपादन प्रक्रियेमध्ये कृतीशील राहून, नविन माहितीची निवड करणे तिचे रुपांतरण करणे, विविध परिकल्पना मांडणे व त्या तपासून आवश्यक तेव्हा त्या परिकल्पना परिवर्तित करणे इत्यादी क्रिया करीत असते.

ब्रुनरच्या मते संबोध निर्मिती (Concept Formation) व संबोध संपादन (Concept attainment) यामध्ये निश्चित असा फरक आहे. वस्तुच्या प्राथमिक निरिक्षणाच्या आधारे जे वर्गीकरण करतो ते संबोध निर्मितीत येते तर संबोध संपादनामध्ये एखाद्या संबोधनसंबंधी विविध प्रकारची पुर्व माहिती विचारात घेतली जाते व विविध दृष्टिकोनातून त्या संबोधाची वैशिष्ट्ये ठरविली जातात.

संकल्पना निर्मितीचे प्रकार :

१. **संयोजक संबोध (Conjuctive Concept)** एखाद्या संबोधाच्या विविध अशा समर्पक वैशिष्टांच्या आधारे व्याख्यित होणारा संबोध म्हणजे संयोजक संबोध होय.

२. **पक्षातंर बोधक संबोध (Disjunctive Concept)** ज्या संबोधामध्ये निकषात्मक वैशिष्टांचा मिलाफ आढळून येतो. त्यास पक्षांतर बोधक संबोध असे म्हणता येईल.

३. **संबंधात्मक संबोध (Ralational Concept)** ज्या संबोधामध्ये विविध घटकांच्या साधारण (Common) वैशिष्टांचा किंवा गुणधर्माचा समावेश होतो. त्यास संबंधात्मक संबोध म्हणता येते.

ब्रुनरने संबोध संपादनासाठी विविध व्यवहार व्युहरचना (Strategy) सांगितले आहेत त्या व्युव्ह-रजनेचे वर्गीकरण त्याने पुर्णत्ववादी व खंडवादी (wholist & partist) असे केलेले आहे तसेच तो संबोध संपादनाच्या मुर्तपातळी, परिचयपातळी, रचनात्मकपातळी व संबोधाचे निष्कर्षण अशा श्रेणी मानतो.

ब्रुनरच्या मते, मानसिक वाढ ही चेतक-प्रतिसाद यांच्यातील साहचर्य संबंधाची हळूहळू होणारी वाढ नाही. तर ही एक प्रकारच्या प्रयत्न व विश्रांती यांच्या जिन्याप्रमाणे असते.

संशोधनाची गरज

शालेय शिक्षणामधुन विद्यार्थ्यांना ज्ञानाचा कक्षा विस्तारल्या जाव्यात ही अपेक्षा अत्यंत मुलभुत आणि स्वाभविक आहे. त्याचबरोबरच विद्यार्थ्यांमधील विविध संकल्पना निर्मितीचा विकास होणेही अपेक्षित आहे.

प्रत्येक विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व वेगळे असते प्रत्येकाची आकलन क्षमता, उपयोजन क्षमता, अवधान कक्षा, आवडी-निवडी व कल इत्यादी भिन्न असते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांची शिकण्याची गती वेगळी असते कौंटुबीक अडचण सांस्कृतिक व सामाजिक घटकांचा तसेच व्यावसायिक कामामुळे शाळेतील अनुपस्थिती इत्यादी बाबींचा अध्ययनावर विपरीत परिणाम होतो. विद्यार्थ्यांच्या अध्ययनात आकलनात आणि कौशल्यविकसनामध्ये उणिवा व त्रुटी राहू शकतात. असे विद्यार्थी संकल्पना निर्मिती प्रक्रियेत मागे पडतात.

त्यांचा संकल्पना निर्मिती क्षमातांचा विकास न झाल्याने ती समायोजन साधु शकत नाहीत व संकल्पना निर्मिती पातळीत मागे पडतात. त्या विद्यार्थ्यांलाही त्यांच्या प्रबळ विषयातील एखाद्या संबोध किंवा संकल्पना निर्मिती क्षमता वाढवण्यासाठी अशा संशोधनाची गरज आहे.

समस्या विधान :

"सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक घटकांचा संकल्पना निर्मितीवर होणारा परिणाम व संकल्पना निर्मितीत येणाऱ्या अडचणीचा अभ्यास. "

संशोधनाच्या कार्यात्मक व्याख्या :

१) समाज :

"समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे. "

२) संस्कृती :

"समाजाचा एक घटक म्हणून व्यक्ती जे ज्ञान,श्रध्दा,कला नितितले प्रथा,लोकाचार व अन्य बाबी प्राप्त करुन घेते त्या सर्वाच्या समिश्र एकीकरणाला संस्कृती असे म्हणतात."

संशोधनाचे उदिष्टये:

१) सांस्कृतिक घटकांचा विद्यार्थ्यांच्या संकल्पना निर्मीतीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

२) सामाजिक घटकांचा विद्यार्थ्यांच्या संकल्पना निर्मीतीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

३) आर्थिक घटकांचा विद्यार्थ्यांच्या संकल्पना निर्मीतीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

४) कौटुंबिक घटकांचा विद्यार्थ्यांच्या संकल्पना निर्मीतीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

५) विद्यार्थ्यांच्या संकल्पना निर्मीतीवर येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करणे.

संधोनाची परिकल्पना :

१) सांस्कृतिक घटकांचा मुलांच्या व मुलीच्या संकल्पना निर्मितीत सार्थ फरक नाही.

२) सामाजीक घटकांचा मुलांच्या व मुलींच्या संकल्पना निर्मितीत सार्थ फरक नाही.

३) आर्थिक घटकांचा मुलांच्या व मुलींच्या संकल्पना निर्मितीत सार्थ फरक नाही.

४) कौंटुबिक घटकांचा मुलांच्या व मुलींच्या संकल्पना निर्मितीत सार्थ फरक नाही.

संशोधनाची व्याप्ती :

१) प्रस्तुत संशोधनासाठी परभणी जिल्ह्याचा विचार केलेला आहे.

२) प्रस्तुत संशोधनासाठी परभणी जिल्ह्यातील ९ तालुक्याचा विचार केलेला आहे.

३) प्रस्तुत संशोधनासाठी ९ तालुक्यातील १८ शाळांचा विचार केलेला आहे.

४) प्रस्तुत संशोधनासाठी उच्च प्राथमिक शाळांचा विचार केलेला आहे.

५) प्रस्तुत संशोधनसाठी उच्च प्राथमिक शाळातील इयता ८ वीच्या विद्यार्थ्यांचा विचार केलेला आहे.

संशोधनाची मर्यादा :

१) प्रस्तुत संशोधन हे परभणी जिल्ह्यापुरते मर्यादीत आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे परभणी जिल्ह्यातील ९ तालुक्यापुरते मर्यादीत आहे.

३) प्रस्तुत संशोधन परभणी जिल्ह्यातील ९ तालुक्यातील १८ शाळापुरते मर्यादीत आहे.

४) प्रस्तुत संशोधन उच्च प्राथमिक स्थरावरील विद्यार्थ्यापुरते मर्यादीत आहे.

५) प्रस्तुत संशोधन उच्च प्राथमिक स्थरावरील इयता ८ वी च्या विद्यार्थ्या पुरते मर्यादीत आहे.

संशोधनाची जनसंख्या :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने परभणी जिल्ह्यातील ९ तालुक्यांचा विचार केलेला आहे.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने परभणी जिल्ह्यातील ९ तालुक्यातील एकूण शाळेपैकी १८ शाळांची निवड केलेली आहे.

संशोधन पध्दत :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सर्वे पध्दतीची निवड केली आहे.

संशोधनाची साधने :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुढील साधनांची निवड केली आहे.

१. निरीक्षण
२. मुलाखत
३. प्रश्नावली

संख्याशास्त्रीय परिणामे :

1) Z-Score 2) 't' -test
3) standard derivation 4) mean

संदर्भ ग्रंथ सुची :

१. अध्ययन उपपती व अध्यापन :

डॉ.ह.ना.जगताप दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय,सोलापुर

संशोधिका

स्वामी दुर्गादेवी सदाशिव
एम.ए.,एम.एड्.,एम.फील.

मार्गदर्शक

डॉ.गिनगिने अशोक पांडुरंग
एम.एस्सी.,एम.एड्.,एम.फिल.,सेन,नेट.,पिएच.डी.,शिक्षणशास्त्र
शिक्षणशास्त्र संकुल स्वा. रा. ती. म. वि.,नांदेड.